बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि २२ मे २०२४**

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २४१/२०२४ भादवि ४२०,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ३१/१२/२०२२ रोजी पासुन ते आजतागायत पर्यंत, वेळोवेळी कित्तुर चन्नम्मा नगर, विजापूर रोड सोलापूर व ऑनलाईन |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/०५/२०२४ रोजी १५.०२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | कांताराम सिद्राम पाटील, वय- ५९ वर्षे, रा. १२९, जयमहालक्ष्मी नगर, मजरेवाडी जवळ, जुळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) प्रियंका सुरज चव्हाण, २) सुरज रमेश चव्हाण, दोघे रा. कित्तुर चन्नम्मा नगर, विजापूर रोड सोलापूर |
| **फसवणुक र.** | : | १४,८६,०००/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे वर्तमान पत्र वाचत असताना नोकरी विषयक जाहिरात पाहिली ती N.T.P.C Recruitment, BE Mecanical, diseal mechanical, Electrical, Diploma Digri, ITI Electrical, fild engineer communication. Con- ९५२९७३४३५१ अशी जाहिरात होती. सदरची जाहिरात पाहुन फिर्यादी मुलगा प्रविण याचे बी ई मेकॅनीकल झाल्याने तो नोकरीस पात्र आहे. म्हणून फिर्यादी यांनी सदर मोबाईल धारकास संपर्क केला असता, सदर मोबाईल धारक यांनी त्यांचे नाव प्रियंका चव्हाण (आरोपीत क्रं.१) असे सांगितले व त्यानंतर आरोपीत क्रं. १ हिने तिचे पती सुरज चव्हाण (आरोपीत क्रं. २) याचे के फोन दिला त्यावेळी आरोपीत क्रं. २ याने फिर्यादीस त्याचे राहते घरी कित्तुर चन्नम्मा नगर याठिकाणी मिटींगसाठी बोलावले. फिर्यादी व मुलगा असे त्यांचे घरी गेले असता, वरील आरोपीतांनी फिर्यादीस तुमच्या मुलास नोकरी लावतो त्याबदल्यात १५,००,०००/- रु दयावे लागतील, तुमच्या मुलास नोकरी लागल्यानंतर ट्रेनिंग काळात ३०,०००/- रु ते ८०,०००/- रु इतका पगार मिळेल असे सांगितले होते. फिर्यादी यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवून आरोपीतांचे खात्यावर वेळोवेळी करुन ९,००,०००/- रु पाठविले होते. थोडया दिवसांनी नोकरी बाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की मंत्रालय मुंबई येथील सचिव यांचेशी बोलणे झाले आहे त्यानंतर बाकीचे राहिलेले पैसे पाठवा असे सांगितल्याने फिर्यादी यांनी उर्वरित रक्कम ही आरोपीत क्रं. १ हिचे फोन पे वर वेगवेगळया तारखेस पैसे पाठविले. एकुण १४,८६,०००/- रु फिर्यादी यांनी आरोपीत क्रं. १ व २ यांना दिले. त्यानंतर फिर्यादी यांनी वेळोवेळी नोकरी संदर्भात आरोपीतांना विचारणा केली असता, दोघेही फिर्यादीस उडवा उडवीची उत्तरे देत होते. त्यानंतर वरील आरोपीतांना वेळोवेळी संपर्क केले असता ते फान उचलत नाहीत तसेच फिर्यादी यांनी दिलेले पैसे परत देत नाहीत यावरुन फिर्यादीची खात्री झाली की वरील आरोपीतांनी मिळुन फिर्यादीकडुन वेळोवेळी ऑनलाईन व रोख स्वरुपात एकुण १४,८६,०००/- रु घेऊन ते रुपये परत मागितले असता आज देतो उदया देतो असे म्हणून सांगून ती रक्कम आजतागायत पर्यंत न दिल्याने फिर्यादीची आर्थिक फसवणकु केलेली आहे म्हणून. तपास:- मपोनि- पाटील- **९७६५०२०९९९** |